# महाराष्ट्र शासन (स्थापित)

## औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, शाखा कार्यालय, जालना, औरंगाबाद

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५अंतर्गत कलम ६ (१) अन्वये स्थापीत कार्यालय - व्दारा, कामगार उपआयुक्त यांचे कार्यालय, विकास भवन, चौथा मजला, डॉ. राजेंद्र प्रसाद मार्ग, बाबा पेट्रोल पंपाजवळ,अदालत रोड, औरंगाबाद ४३१००१ दुरध्वनी – ०२४० -२३२३०९

जावक क्रमांक :५७० /२०२३ दिनांक :-१४/०८/२०२३

### आदेश

विषय :- औरंगाबाद जिल्हयातील व शाखा कार्यालय जालना जिल्हयातील सुरक्षा रक्षकांचे वेतनातील विशेष भत्याचे (महागाई भत्ता) व तद्अनुषांगीक भत्यामध्ये सुधारणा करणे बाबत.

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक एसजीए /१४२००२/९१५/ कामगार -५, दिनांक १२ नार्व्हेबर २००२ अन्वये औरंगाबाद जिल्हयासाठी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ लागु केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक एसजीए /१३२००२/२०२/१२/५, दिनांक ०६ फेब्रुवारी २००३ अन्वये औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक एक सदस्यीय मंडळ स्थापन केलेले आहे.

तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ०५/०६/२००९ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचने नुसार जालना जिल्हयासाठी औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ लागू केलेले आहे.

मा.सह आयुक्त कामगार (माथाडी),मुंबई यांचे दिनांक ०९/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये व मा.अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक ०२/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्व्ये सुरक्षा रक्षकांच्या वेतनामध्ये रक्कम रुपये १४२९/- तीन वर्षाकरीता वाढ करण्यास मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मंडळाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ च्या कलम ६ नुसार एकसदस्यीय मंडळाच्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ च्या कलम ०३ (२) (५) अन्वये महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ च्या खंड ३० अन्वये दिनांक ०५/०६/२०२३ रोजीच्या ठरावानुसार औरंगाबाद जिल्हयातील व शाखा कार्यालय जालना जिल्हयातील सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चिती करण्यात आलेले असून दिनांक १५/०६/२०२३ रोजी जाहीर करण्यात आलेले आहे.

मा.कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे दिनांक **०१/०८/२०२३** रोजीच्या परिपत्रकानुसार औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ व शाखा कार्यालय जालना जिल्हयातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे विशेष भत्याचे (महागाई भत्ता) दर व घरभाडे दर दिनांक **०१ जुलै २०२३** पासून पुढील आदेशा पर्यंत खालील प्रमाणे वेतनामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | मूळ वेतन रूपये दिनांक १/८/२०२२ पासून | महागाई भत्ता रूपये १/७/२०२३ पासून | घरभाडे भत्ता ५% (मूळ वेतन+ महागाई भत्ता) १/७/२०२३ पासून | वाहन भत्ता रूपये १/८/२०२२ पासून | शैक्षणिक भत्ता रूपये १/८/२०२२ पासून | धुलाई भत्ता रूपये १/८/२०२२ पासून | एकुण वेतन रूपये | लेव्ही ४०.५०% (मूळ वेतन + महागाई भत्ता) रूपये | ईएसआयसी ३.२५% (घरभाडे भत्ता +वाहन भत्ता + शैक्षणीक भत्ता+ अतिरीक्त कामकाज) रूपये | एकुण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सुरक्षा रक्षक | १३२७४ | २६७८ | ७९८ | ६६० | ५५० | ६६० | १८६२० | ६४६१ | ६५ | २५१४६ |
| ०२ | सुरक्षा पर्यवेक्षक | १३८८७ | २६७८ | ८२८ | ६६० | ५५० | ६६० | १९२६३ | ६७०८ | ६६ | २६०३७ |
| ०३ | सुरक्षा अधिकारी | १४५१३ | २६७८ | ८६० | ६६० | ५५० | ६६० | १९९२१ | ६९६२ | ६७ | २६९५० |

१. शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई अधिसूचना दिनांक २० जुलै २००४ व शुध्दीपत्रक अधिसूचना दिनांक १८ ऑगस्ट २००४ व दिनांक २८/०९/२०१० तसेच शासनाने उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई अधिसूचना दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ च्या अधिन राहुन औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या व शाखा कार्यालय जालना येथील सुरक्षा रक्षकांचे उपरोक्त प्रमाणे किमान वेतन जाहीर करण्यात येत आहे.

२. मंडळाने सुरक्षा रक्षकांसाठी उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेले वेतनाचे दर दिनांक **०१ जुलै २०२३** पासून पुढील आदेशा पर्यंत अंमलात राहतील.

३. मंडळाच्या दिनांक ०५/०६/२०२३ रोजी एकसदस्यीय मंडळाच्या ठरावानूसार दिनांक १५/०६/२०२३ रोजीच्या आदेशानूसार दिनांक ०१/०८/२०२३ रोजी पासूनऔरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, व शाखा कार्यालय जालना येथील सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्यात आलेले आहे.

४. शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई अधिसूचना दिनांक २० जुलै २००४ व शुध्दीपत्रक अधिसूचना दिनांक १८ ऑगस्ट २००४ च्या अधिसूचने अन्वये कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे दिनांक **०१/०८/२०२३** रोजीच्या परिपत्रकानुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील कामगारांकरीता दिनांक ०१/०७/२०२३ पासून विशेष भत्ता (महागाई भत्ता) रक्कम रूपये **२,६७८/-** उपरोक्त वेतनामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

५. उपरोक्त वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीचा समावेश असेल. दररोज आठ तासाच्या कामाच्या एका पाळी करीता महिण्यातील २६ दिवसाकरीता लागु आहेत. दैनंदिन वेतनात मुळ वेतन, विशेष भत्ता (महागाई भत्ता) व इतर भत्ते मिळुन येणा-या एकुण वेतनास २६ ने भागून येणारा भागाकार पूर्णाकांत करून एक दिवसाचे वेतन काढण्यात येईल. (तसेच फेब्रुवारी महिन्यासाठी उपरोक्त वेतन हे २४ दिवसाकरीता लागू असून वेतनास २४ ने भागावे)

६. सुरक्षा रक्षकांनी केलेल्या अतिरीक्त कामाचे (Over Time) दर हे मुळ वेतन अधिक विशेष भत्ता मिळून येणा-या एकुण रक्कमेस २६ ने भागुन येणारा भागाकार पुर्णाकांत करुन एक दिवसाचे वेतन काढण्यात यावे. तसेच फेब्रुवारी महिण्यासाठी मुळ वेतन +विशेष भत्ता येणा-या एकुण रक्कमेस २४ ने भागुन येणारा भागाकार पुर्णाकांत करुन एक दिवसाचे वेतन काढण्यात यावे.व सदर रक्कमेच्या दुप्पट वेतन अतिरिक्त कामकाजासाठी देणे बंधनकारक राहील.

७. उपरोकृत किमान वेतनावर (मुळ वेतन + विशेष भत्ता ( महागाई भत्ता) = मुळ वेतन) ४०.५०% दराने लेव्ही देणे तसेच घरभाडे भत्ता,प्रवास भत्ता,शैक्षणिक भत्ता व अतिरीक्त कामकाजावर (ओ.टी.वर) ३.२५% दराने लेव्ही देणे मुख्य मालकास /नियोक्त्यास सुरक्षा रक्षका करता उपरोक्त अधिनियम व योजनेतील तरतुदीनूसार देणे बधंनकारक राहील.

८. नोंदीत मुख्य मालकांनी त्यांच्याकडे नोंदीत तैनात असलेल्या सर्व वर्गवारीच्या सुरक्षा रक्षकांचे देय वेतन व लेव्हीची रक्कम दरमहा ०५ तारखेपर्यंत धनादेशाव्दारे/आरटीजीएसव्दारे मंडळाच्या कार्यालयात जमा करणे मुख्य मालकावर बंधनकारक राहील.

अन्यथा महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक(नौकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ च्या तरतुदीनूसार कारवाई करण्यात येईल.

(श्री.गु.मुंढे)
सरकारी कामगार अधिकारी तथा सचिव,
औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ,
शाखा कार्यालय, जालना,औरंगाबाद

प्रति,

व्यवस्थापक
मे. नालसन्स प्राईव्हेट लि.
औरंगाबाद

## आदेश

विषय – कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर सुरक्षा रक्षकांचे वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती पुर्ननिधारीत करणेबाबत..

संदर्भ – कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर एक सदस्यीय मंडळाचे दि. ११/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ४३

ज्याअर्थी मंडळाचे अध्यक्षानी मंडळाच्या वतीने मंडळाचे कोल्हापूर जिल्ह्यातील सुरक्षा रक्षकांचे सध्याचे वेतनदर पुर्ननिधारीत करण्याबाबत आणि सुरक्षा रक्षकांचे वेतन भत्ते व इतर सेवाशर्ती निश्चित करण्याबाबत आणि ज्याअर्थी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजनेचे खंड ३० नुसार मंडळाच्या अध्यक्षांना प्रत्यायोजित केलेल्या अधिकाराचा वापर करुन कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती खाली दर्शविल्याप्रमाणे दि. ०१/०८/२०२२ पासून अंतिमत: पुर्ननिधारित जेथे जे लागू असेल ते करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वर्गवारी | मुळ वेतन | महागाई भत्ता |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक | ११३६२ | दि.०१/०७/२०२२ ते ३१/१२/२०२२ महागाई भत्ता रु. २.१०६/-<br>दि.०१/०१/२०२३ ते ३१/०६/२०२३ महागाई भत्ता रु. २.४४४/- |
| २ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२२६४ | |
| ३ | सुरक्षा रक्षक अधिकारी | १३१०२ | |

स्पष्टीकरण : या आदेशाच्या प्रयोजनार्थ – कोल्हापूर जिल्हयाचे संपूर्ण कार्यक्षेत्र असा आहे.

- **देय महागाई भत्ता-**

  वर नमुद केलेल्या मुळ वेतनाशिवाय खाली नमुद केलेले योजनेनुसार विशेष भत्ता/ महागाई भत्ता मंडळाचे नोंदित सुरक्षा रक्षकांना त्यांचे मुख्य मालकाकडून देय राहील. सक्षम प्राधिकारी किंवा उक्त मंडळाचे अध्यक्ष किंवा सचिव वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेल्या महागाई भत्ता जुन व डिसेंबर अखेरपर्यंतच्या सरासरी ग्राहक मुल्य निर्देशांकावर आधारीत किंवा यथास्थिती वेतन व दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकापासून म्हणजेच जुलै व डिसेंबरमध्ये जाहीर करील.

- **घरभाडे भत्ता-**

  मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना सर्व वर्गवारीच्या मुळ वेतन व महागाई भत्त्यावर ०५% दरमहा घरभाडे अदा करावे.

- **धुलाई भत्ता –**

  मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना दरमहा रु. ५००/- धुलाई भत्ता अदा करावा.

Scanned with CamScanner

- **प्रवास भत्ता –**

मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना दरमहा रु. ५००/- प्रवास भत्ता अदा करावा.

- **शैक्षणिक भत्ता-**

मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना दरमहा रु. ७००/- शैक्षणिक भत्ता अदा करावा.

वरील वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीचा समावेश असेल. परंतु साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी काम करुन घेतल्यास दुप्पट दराने वेतन दयावे लागेल. रोजंदारी कामगाराच्या बाबतीत रोजंदारी वेतन हे मुळ वेतन व महागाई भत्ता मिळुन येणा-या वेतनास २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैश्यापर्यंत पूर्णांकांत करुन काढण्यात येईल. तसेच सदर वेतन हे ८ तासाच्या कामासाठी निश्चित केलेले आहेत.

तसेच मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षक दररोज ८ तासापेक्षा जादा काम करेल त्यास सर्वसाधारणपणे जादा कामाकरीता वेतन दराच्या दैनंदिन दराचे दुप्पट वेतन अतिकालीन वेतन (ओव्हर टाईम वेजेस) म्हणून कामाच्या प्रमाणात मुख्य नियोक्त्यास दयावे लागेल.

उपरोक्त् वेतनावर (मुळ वेतन + महागाई भत्ता) ४२% प्रचलित अधिभार (लेव्ही) मुख्य नियोक्त्यास देणे कायदेशीर दृष्टया बंधनकारक राहील. शिवाय घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता व जादा कामाच्या भत्त्यावर ३.२५% ईएसआय ची लेव्ही भरणे बंधनकारक आहे.

उपरोक्त् किमान वेतन व भत्ते, तसेच ४२% अधिभार (लेव्ही) मंडळाचे नोंदीत मुख्य मालकांनी त्यांचेकडे मंडळाचे नोंदीत तैनात असलेल्या सर्व वर्गवारीच्या सुरक्षा रक्षकांकरीता दरमहा ५ तारखेपर्यंत मंडळाचे कार्यालयात धनादेशाने किंवा नेट बँकिंग द्वारे जमा करणे त्यांचेवर बंधनकारक आहे.

(वि.वि.शेंडके)
सहायक कामगार आयुक्त् तथा अध्यक्ष,
कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर.

कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ
कोल्हापूर

Scanned with CamScanner

## बैठक क्र. ४३

दि. ११/०७/२०२३ रोजी दु.३.०० वाजता एक सदस्य मंडळाचे अध्यक्ष व सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय कोल्हापूर येथे बैठक घेण्यात आली. त्यामध्ये खालील विषयावर सविस्तर चर्चा करुन ठराव मंजूर करण्यात आला.

## ठराव क्र. ४३

विषय - कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर सुरक्षा रक्षकांचे वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती पुर्ननिधारीत करणेबाबत..

मंडळाकडील नॉदीत सुरक्षा रक्षक चे वेतन वाढ करावी म्हणून, मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध कामगार संघटनांचा प्रस्ताव मंडळास प्राप्त झाले होते. यावर संघटना प्रतिनिधी व मालक प्रतिनिधी यांच्यासोबत दि. २२/०२/२०२३ व दि. २७/०२/२०२३ रोजी बैठक घेणेत आली. त्यानुसार पुढील तीन वर्षाकरीता सुरक्षा रक्षकांची वेतन वाढ महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व त्या अंतर्गत योजना २०१२ मधील खंड ३० नुसार निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली.

यानुसार मंडळाने सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वर्षाचा कोल्हापूर केंद्रांचा महागाई निर्देशांकास सरासरी ७.६६ % इतकी वाढ करणेत आली. त्या आधारे दि. ०१/०८/२०२२ ते ३१/०७/२०२५ या कालावधी करीता मसुदा वेतन वाढ प्रस्तावित करणेत येवून.रु.१,५४३/- लेव्हीसह वेतन वाढ करणेत आली. सदर वेतन वाढबाबतचा प्रस्ताव मा.सहा आयुक्त (माथाडी), कामगार कार्यालय मुंबई यांना दि. १०/०३/२०२३ रोजी पाठविणेत आला. त्यानुसार कामगार आयुक्त कार्यालय मुंबई क्र. सुरक्षा/वेतनवाढ प्रस्ताव /२०२३/कार्या-१४,१६३ दि. ०९/०५/२०२३ रोजी मा. सह आयुक्त (माथाडी) मुंबई यांचे कडून सुरक्षा रक्षक मंडळास सुरक्षा रक्षकांच्या वेतन व त्याप्रमाणत भत्ते यामध्ये ३ वर्षे कालावधीसाठी वाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि, मंडळाकडे नॉदीत ३८ मालक आस्थापना आहेत, पैकी काही नॉदित मालक आस्थापना यांचेकडून हरकती नोंद घेण्यात आली. या सर्व बाबी विचारात घेऊन मंडळाने दिनांक ०१/०८/२०२२ पासून कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील कार्यक्षेत्रातील कार्यरत असणा-या सुरक्षा रक्षक यांना रु. १,५४१/- एकत्रित वाढ व प्रति सहा महिन्याचा महागाई भत्ता वेतन वाढ करणेस, एक सदस्यिय मंडळाने मंजूरी देण्यात आली आहे.

**सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते यामध्ये सुधारणा केलेनंतरचे वेतन-**

| अ क्र | सुरक्षा रक्षकांचा हुद्दा | मुळ वेतन | विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणिक भत्ता | एकुण वेतन व भत्ते | लेव्ही | | एकुण वेतन व लेव्ही (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | ४२% लेव्ही (३+४) | ३.२५% लेव्ही (५+७+८) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सुरक्षा रक्षक | ११,३६२/- | २,४४४/- | ६९०/- | ५००/- | ५००/- | ७००/- | १६,१९६/- | ५७९८/- | ६१/- | २२,०५५/ |
| २ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२,२६४/- | २,४४४/- | ७३५/- | ५००/- | ५००/- | ७००/- | १७,१४३/- | ६१७७/- | ६३/- | २३,३८३/ |
| ३ | सुरक्षा अधिकारी | १३,१०२/- | २,४४४/- | ७७७/ | ५००/- | ५००/- | ७००/- | १८,०२३/- | ६५२१/- | ६४/- | २४,६१६/ |

कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ कोल्हापूर

(वि.वि.घोडके)
सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,
कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर.

Scanned with CamScanner

सबब दि. ०१/०७/२०२३ पासून सुधारीत वेतन व इतर भत्ते तसेच डी.ए वाढ लागू करणेत आलेली असून दि. १ जुलै. २०२३ च्या वेतनामध्ये समाविष्ठ करुनच सुरक्षा रक्षकांचे वेतन अदा करावे. तसेच सुरक्षा रक्षकांना कामगार राज्य विमा योजना लागू करणेत आलेली असून कोल्हापूर जिल्हयातील मुख्य मालकांनकडून सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मुळ किमान वेतन + विशेष भत्त्याची रक्कम = एकूण किमान वेतन) ४२ % दराने व घर भाडे भत्ता, प्रवास भत्ता, अतिरिक्त कामाचा मोबदला व शैक्षणिक भत्ता यावर ३.२५% दराने लेव्ही देणे बंधनकारक आहे.

तरी सुधारीत दराप्रमाणे वेतन वाढ करणेत आलेले, मुळ वेतन, महागाई भत्ता व इतर भत्ते यांचे वेतनदर पत्रक पुढील प्रमाणे –

| अ. क्र | सुरक्षा रक्षकांचा हुद्दा | मुळ वेतन (रु.) | विशेष भत्ता/ महागाई भत्ता (रु.) | घरभाडे भत्ता ५% (३+४) | प्रवास भत्ता (रु.) | शैक्षणिक भत्ता (रु.) | धुलाई भत्ता (रु.) | एकूण वेतन व भत्ते (रु) | लेव्ही ४२% लेव्ही (३+४) | लेव्ही ३.२५% लेव्ही (५+६+७ ESIC | एकूण वेतन व लेव्ही (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सुरक्षा रक्षक | ११,३६२/- | २,६७८/ | ७०२/- | ५००/- | ७००/- | ५००/ | १६,४४२/ | ५,८९७/ | ६२/- | २२,४०१/- |
| २ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२,२६४/- | २,६७८/ | ७४७/ | ५००/- | ७००/- | ५००/ | १७,३८९/ | ६,२७६/ | ६३/- | २३,७२९/- |
| ३ | सुरक्षा अधिकारी | १३,१०२/- | २,६७८/ | ७८९/- | ५००/- | ७००/- | ५००/ | १८,२६९/- | ६,६२८/ | ६५/- | २४,९६२/- |

तसेच दि. ०१/०८/२०२२ ते दि. ३१/०७/२०२३ या कालावधीतील मुळ वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, धुलाई भत्ता, प्रवास भत्ता, व शैक्षणिक भत्ता यामध्ये वाढ झालेला फरक त्या महिन्यानुसार स्वंतत्र पत्राने अवगत करणेत येईल, तो अदा करावा.

तसेच १० क्रमांकच्या कॉलमेचे ४२% लेव्हीची विगतवारी सुलभ संदर्भासाठी पुढील प्रमाणे-

| अ.क्र. | लेव्हिची विगतवारी तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | भविष्य निर्वाह निधी | १२% |
| २ | सानुग्रह अनुदान | ८.३३% |
| ३ | रजेचा पगार | ४% |
| ४ | पगारी सुट्टी | १% |
| ५ | उपदान | ४% |
| ६ | ई.एस.आय. | ३.२५% |
| ७ | गणवेश | ४% |
| ८ | प्रशासकिय निधी | ५% |
| ९ | गंगाजळी | ०.४२ |
|  | एकूण | ४२% |

आपला विश्वासू,

(वि.क्रि.घोडके)
सहाय्यक कामगार आयुक्त, तथा अध्यक्ष
कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर.

कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन स्थापित

# नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ,नागपर

( कार्यक्षेत्र नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा )

लोटस प्लॅाझा, प्लॅाट नं- १, २ पहीला माळा, जुने व्ही.सी.ए. स्टेडीयमचे समोर सिव्हील लाईन, नागपूर ०१

Constituted under Section 6 of the Maharashtra Private Security Guard (Regulation of employment and Welfare) Act, 1981

दुरध्वनी क्रमांक -२५६०८६२, २५५७१४२, २५५७४०५

Email-ndsgbnagpur@gmail.com

पत्र क्रं./नाजिसुरम-नाग/वेतनदर/३३०० / २०२३ दिनांक : ४.९.२०२३

## सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते दि. १ जुलै २०२३ ते ३१ डिसेबंर २०२३ पर्यत

| अ.क्र | पदनाम | मुळ वेतन (१.५.२०२३ पासुन ) | विशेष भत्ता दि. १.७.२०२३ पासुन | मुळ वेतन + विशेष भत्ता | घरभाडे भत्ता २० टक्के (मुळ वेतन + विशेष भत्ता ) | प्रवास भत्ता दरमहा रु ६०० | धुलाई भत्ता दरमहा रु ६०० | शैक्षणीक भत्ता दरमहा रु ६०० | एकुण वेतन | देय लेव्ही ४३ टक्के | वेतन व लेव्ही मिळून एकुण रक्कम ( २६ दिवस) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरक्षा रक्षक / महिला सुरक्षा रक्षक | १२९८४.०० | २६७८.०० | १५६६२.०० | ३१३२.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २०५९४.०० | ६७३५.०० | २७३२९.०० |
| २. | मुख्य सुरक्षा रक्षक | १३२५९.०० | २६७८.०० | १५९३७.०० | ३१८७.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २०९२४.०० | ६८५३.०० | २७७७७.०० |
| ३. | सुरक्षा पर्यवेक्षक | १३९५९.०० | २६७८.०० | १६६३७.०० | ३३२७.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २१७६४.०० | ७१५४.०० | २८९१८.०० |
| ४. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | १४१८४.०० | २६७८.०० | १६८६२.०० | ३३७२.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २२०३४.०० | ७२५१.०० | २९२८५.०० |
| ५. | सुरक्षा अधिकारी | १४६३४.०० | २६७८.०० | १७३१२.०० | ३४६२.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २२५७४.०० | ७४४४.०० | ३००१९.०० |
| ६. | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५०८४.०० | २६७८.०० | १७७६२.०० | ३५५२.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २३११४.०० | ७६३८.०० | ३०७५२.०० |
| ७. | माजी सैनीक सुरक्षा पर्यवेक्षक | १७०५४.०० | २६७८.०० | १९७३२.०० | ३९४६.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २५४७८.०० | ८४८५.०० | ३३९६३.०० |
| ८. | माजी सैनीक सुरक्षा रक्षक | १३२९४.०० | २६७८.०० | १५९७२.०० | ३१९४.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २०९६६.०० | ६८६८.०० | २७८३४.०० |

उपरोक्त दराव्यतीरीक्त सुरक्षा रक्षकांचे वेतनावर खालील प्रमाणे मुख्य नियोक्त्यास लेव्ही देणे कायदेशिरदृष्टया बधंनकारक राहील.

लेव्हीची विगतवारी खालील प्रमाणे

| अ.क्र. | लेव्ही शिर्षक | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | भविष्य निर्वाह निधी | १२% |
| २. | सानुग्रह अनुदान | ८.३३% |
| ३. | उपदान | ४% |
| ४. | आस्थापना खर्च | ५.००% |
| ५. | सवेतन सुट्टी | १.२५% |
| ६. | वैद्यकीय खर्च | ४.००% |
| ७. | कामगार क्षतीपुर्ती (नुकसान भरपाई) | ०.७५% |
| ८. | कॉपर्स फंड (राखीव निधी) | ०.६७% |
| ९. | सुट्टया रजा | ४% |
| १०. | गणवेश | ३% |
| | एकुण | ४३% |

| अ.क्र | पदनाम | मुळ वेतन + विशेष भत्ता मिळुन प्रदिदिन वेतन रुपये | मुळ वेतन + विशेष भत्ता + घरभाडे भत्ता + प्रवास भत्ता + धुलाई भत्ता + शैक्षणिक भत्ता + लेव्ही मिळुन प्रतिदिन वेतन रुपये |
|---|---|---|---|
| १. | सूरक्षा रक्षक / महिला सुरक्षा रक्षक | ६०२.०० | १०५१.०० |
| २. | मुख्य सुरक्षा रक्षक | ६१३.०० | १०६८.०० |
| ३. | सुरक्षा पर्यवेक्षक | ६४०.०० | १११२.०० |
| ४. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | ६४९.०० | ११२६.०० |
| ५. | सुरक्षा अधिकारी | ६६६.०० | ११५५.०० |
| ६. | मुख्य सुरक्षा अधिकारी | ६८३.०० | ११८३.०० |
| ७. | माजी सैनीक सुरक्षा पर्यवेक्षक | ७५९.०० | १३०६.०० |
| ८. | माजी सैनीक सुरक्षा रक्षक | ६१४.०० | १०७१.०० |

टिप :- १. उपरोक्त प्रतिदिन दर हे २६ दिवसाचे आहे, साप्ताहीक सुटीचे दिवसाकरीता रीलीवर पाठविल्यास त्याचे प्रतिदिन दरानुसार वेतन देय राहील.

२. शासनातर्फे जानेवारी व जुलै महिन्यामध्ये किमान अधिनियमानुसार विशेष भत्त्यामध्ये झालेली वाढ होते ती आपणांस देय राहील

कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार किमान वेतन अधिनियम, १९४८ अतंर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील कामगारांसाठी वेळोवेळी प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै या महिन्यात नमुद केलेला विशेष भत्ता /महागाई भत्ता मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षकांना त्यांना तैनात करणा-या त्यांच्या मुख्य मालकांना देणे बधंनकारक राहील.

सचिव
नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ
नागपूर यांचे करीता

प्रति,

------------------------------------
------------------------------------
------------------------------------
------------------------------------

जा.क्र:- नाजिसुरमं/अध्यक्ष/वि.भ.२०२३/१९७७
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.
१ ला मजला, झंन्कार हॉटेल गंजमाळ बस स्टॉप,
कामगार न्यायालयाजवळ, नाशिक ४२२ ००१.
दूरध्वनी क्र : ०२५३-२५९००३१.
दिनांक : ०२/०८/२०२३

**आदेश**

**विषय :-सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुट प्राप्त सुरक्षा रक्षक/मुख्य सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक यांचे विषेशभत्ता/महागाई भत्त्यामध्ये दि. ०१.०७.२०२३ पासून सुधारणा करणेबाबत....**

**संदर्भ** : कामगार उप आयुक्त, (ग्रा.वि.) मुंबई यांचे पत्र क्र. ग्रा.वि. / कि.वे.अ. / वि.भ. / २०२३(२) / कार्या-१० दि. ०१.०८.२०२३ रोजीचे पत्र.

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत **सुट प्राप्त** सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्याचे अधिकार " **महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत)** २००२ **मधील खंड** ३० **मध्ये**" नमूद करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मंडळातील सुरक्षा रक्षकांच्या वेतनासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या रोजगारासाठी पुनर्निर्धारित करण्यात आलेले किमान वेतनाचे दर आधारभूत प्रमाण मानून मंडळाने यापूर्वी मान्य केलेले आहेत. त्यानुसार उक्त अनुसुचित उद्योगधंद्यासाठी शासनाने वेळोवेळी जाहीर केलेला विषेश भत्ता मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना वेळोवेळी लागू करण्यात येत आहे.

क्र. ग्रा.वि. / कि.वे.अ. / वि.भ. / २०२३(२) / कार्या-१० किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्त्याची रक्कम दि. ०१.०७.२०२३ ते दि. ३१.१२.२०२३ या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेली आहे. त्यानुसार "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता **दि. ०१.०७.२०२३ ते ३१.१२.२०२३** या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेले विशेष भत्त्याचे दर नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक या मंडळाच्या नोंदणीकृत सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / मुख्य सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक यांना लागू राहतील.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना दि. ०१.०७.२०२३ पासून ते ३१.१२.२०२३ पर्यंत सुधारीत महागाई भत्त्यासह लागू करण्यात आलेले वेतन व भत्ते**

| अ.क्र. | पद | मुळवेतन | विषेशभत्ता/ महागाईभत्ता | घरभाडेभत्ता (३+४)५% | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणीक भत्ता | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२८७९ | २६७८ | ७७८ | १३०० | २९४ | ३०० | १८२२९ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १२१०३ | २६७८ | ७३९ | १३०० | २९४ | ३०० | १७४१४ |
| ३ | सुरक्षा रक्षक | ११२६८ | २६७८ | ६९७ | १३०० | २९४ | ३०० | १६५३७ |

..२..

Scanned with CamScanner

* किमान वेतन = मुळवेतन + विषेश भत्ता / महागाई भत्ता

सुट प्राप्त एजन्सी मालकांनी सुरक्षा रक्षक / **मुख्य** सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/यांना पुढील प्रमाणे इतर फायदे/लाभ देणे बंधन कारक आहे.

१) **सानुग्रह अनुदान :** किमान वेतनाच्या १०% २) **उपदान :** किमान वेतनाच्या ४ % ३) **भरपगारी रजा :** किमान वेतनाच्या ६ % ४) **भरपगारी सुट्टी :** किमान वेतनाच्या १ %.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावरील ३% लेव्ही दरमहा ५ तारखेपर्यंत मंडळात आर.टी.जी.एस. / DD द्वारे / धनादेशा द्वारे जमा करणे बंधन कारक आहे. सबब, मंडळातील सर्व नोंदीत सुट प्राप्त एजन्सी मालकांना या द्वारे असे सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांना दि. ०१.०७.२०२३ पासून ते दि. ३१.१२.२०२३ पर्यंत सुधारीत वाढीव वेतनासह व विषेश भत्ता / महागाई भत्त्याच्या फरकासह रक्कम विनाविलंब सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांना अदा करावी. तसेच सुधारीत वेतनाबाबत प्रशासकीय सुट प्राप्त लेव्हीच्या फरकाची रक्कम मंडळाकडे विनाविलंब जमा करावी.**

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ — महाराष्ट्र शासन स्थापित — नाशिक

कामगार उप आयुक्त तथा अध्यक्ष
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ,
नाशिक.

प्रति,
गुलाब काळे स्वार
एस आर. एल लि.
नाशिक,
महाराष्ट्र

संदर्भ क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२३-४०५४
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५.
दूर.०२२-३५२५२३४६/३४७/३४८/३४९/३५०,
E-mail ID : sgb_sanpada@yahoo.co.in

दिनांक : - ३ ऑगस्ट, २०२३

# आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि.१.७.२०२३ पासून करण्यांत येणारी सुधारणा व राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेबाहेर गेलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (W.C.) च्या तरतुदी लागू करण्याबाबत.**

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२३-८३०, दि.१.२.२०२३ च्या आदेशान्वये दि.१ जानेवारी, २०२३ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/कि.वे.अ./विभ/२०२३(२)/कार्या-१०, दि.१.८.२०२३, अन्वये दि.१ जुलै, २०२३ ते दि.३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.२,६७८.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. २.८.२०२३ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि.१ जुलै, २०२३ ते दि.३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीकरीतां रु.२,६७८.०० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे. नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०२३-२४६७, दि.१६ मे, २०२३ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

मंडळामार्फत कार्यरत सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी हे राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेबाहेर गेले आहेत. त्यांचे हित लक्षात घेऊन मंडळाने उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां कामगार भरपाई अधिनियम, १९२३ ची योजना दि.१.७.२०२३ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचा निर्णय घेऊन दि.२.८.२०२३ रोजी ठराव पारित केलेला आहे. सबब, कामगार राज्य विमा योजनेकरीतां उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां आकारण्यांत येणारी किमान वेतन (मुळ वेतन + महागाई भत्ता), घरभाडे भत्ता, अतिकालीक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता यावरील आकारण्यांत येणारी ३.२५% लेव्ही कमी करण्यांत आली असून कामगार भरपाई अधिनियम, १९२३ योजनेकरीतां किमान वेतनाच्या १ टक्का लेव्ही आकारण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर लेव्हीमधील बदल मंडळाच्या ERP प्रणालीत करण्यांत आलेले आहेत.

**सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक, मुख्य सुरक्षा रक्षक, सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी यांना दि.१.७.२०२३ पासून लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते**

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४५.२५ %) रुपये | लेव्ही रु (घरभाडे, रजाकालीन प्रवास भत्ता @ ३.२५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ म.सु.रक्षक | १३,४५७.०० | २,६७८.०० | ३,२२७.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २२,८६२.०० | ७,३०१.०० | १०८.०० | ३०,२७१.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १३,७३२.०० | २,६७८.०० | ३,२८२.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २३,१९२.०० | ७,४२६.०० | ११०.०० | ३०,७२८.०० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | १४,४३२.०० | २,६७८.०० | ३,४२२.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,०३२.०० | ७,७४२.०० | ११४.०० | ३१,८८८.०० |
| ४ | सहा.सु. अधिकारी | १४,६५७.०० | २,६७८.०० | ३,४६७.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,३०२.०० | ७,८४४.०० | ११६.०० | ३२,२६२.०० |

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४५.२५% दराने व घरभाडे भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ३.२५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

.....२

**सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांना दि.१.७.२०२३ पासून लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते**

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४३%) रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा अधिकारी | १५,१०७.०० | २,६७८.०० | ३,५५७.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,८४२.०० | ७,६४८.०० | ३२,४९०.०० |
| २ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५,५५७.०० | २,६७८.०० | ३,६४७.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,३८२.०० | ७,८४१.०० | ३३,२२३.०० |

*** किमान वेतन = मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता**

बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४३% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

सबब, मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशित करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा कर्मचारी यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार दि.१.७.२०२३ पासून सुधारीत दराने वेतन व लेव्ही मंडळास अदा करण्यांत यावी.

Security Guards Board for Br. Bombay & Thane District
Sanpada, Navi Mumbai.

**सही/-**
(अशोक ल. डोके)
**कामगार उप आयुक्त** व
**अध्यक्ष**
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**
**प्रति,**
**मे. ..............................................., नों.क्र. ........., युनिट क्र. .........**
**...................................................................**

**This being a computerised printed copy, signature is not required.*

*Z/WG REV for ESIC 2023

महाराष्ट्र शासन
(स्थापित)
सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली, सातारा.
महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१
**मुख्य कार्यालय पत्ता :-** प्लॉट नं. ९४ ए, सांगली चेंबर ऑफ कॉमर्सच्या समोर, पद्मभूषण वसंतदादा पाटील मार्केट यार्ड, सांगली.- ४१६ ४१६
फोन नं: ०२३३-२६७५३३५ Email ID: sgbsangli@gmail.com

**जा.क्र सकाआ/सुरमं/९९८** **दिनांक:- ०९/०८/२०२३**

## आदेश

या कार्यालयाकडील आदेश दिनांक ०१/०८/२०२३ अन्वये नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते वाढ करण्यात आलेले आहेत. शासनाकडील दि.०२/०५/२०२३ च्या पत्रानुसार मूळ वेतनात व लेव्हीत वाढ झालेमुळे सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्ते या मध्ये सुधारणा करण्यात आलेले आहेत. ज्या अर्थी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक नोकरीचे नियमन व कल्याण योजनेचे खंड ३० नुसार मंडळाच्या अध्यक्षांना प्रत्यायोजित केलेल्या अधिकाराचा वापर करुन सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती खाली दर्शविल्याप्रमाणे दि. ०१/०७/२०२३ पासून अंतिमतः पुनर्निधारित लागू करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम ६ नुसार एक सदस्य मंडळाच्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१च्या कलम ०३ (२) (५) व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ मधील खंड ३० अन्वये सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली , सातारा या मंडळाकडील सुरक्षा रक्षकांचे दर खालीलप्रमाणे निर्धारीत करण्यात येत आहेत.

दिनांक:- ०१ जुलै २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीकरीता दरमहा वेतन व भत्ते यामध्ये सुधारणा केलेला तक्ता-

| अ. क्र | सुरक्षा रक्षकांचा हुद्दा | मुळ वेतन (रू.) | विशेष भत्ता/ महागाई भत्ता रू.) | घरभाडे भत्ता ५% (३+४) (रू.) | प्रवास भत्ता (रू.) | शैक्षणिक भत्ता (रू.) | धुलाई भत्ता (रू.) | एकुण वेतन व भत्ते (रू.) | लेव्ही | | एकूण वेतन व लेव्ही (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | ४२% लेव्ही (३+४) | ३.२५% (५+६+७) ESIC | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सुरक्षा रक्षक | ११८१७ | २,६७८ | ७२५ | ४०० | ४०० | ६०० | १६,६२० | ६,०८८ | ५६ | २२,७६४ |
| २ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२६५२ | २,६७८ | ७६७ | ४०० | ४०० | ६०० | १७,४९७ | ६,४३९ | ५७ | २३,९९३ |
| ३ | सुरक्षा अधिकारी | १३४२८ | २,६७८ | ८०५ | ४०० | ४०० | ६०० | १८,३११ | ६,७६५ | ५९ | २५,१३५ |

सांगली-सातारा जिल्हातील मुख्य मालकांनी नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन+विशेष भत्ता/ महागाई भत्ता) ४२% टक्के दराने लेव्ही व घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता व अतिकालीन कामाचा भत्ता यावर ३.२५% टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक राहिल.

नोंदित सुरक्षा रक्षकांना निश्चित केलेले वेतन व भत्ते हे २६ दिवसाकरीता ८ तासाच्या कामास राहिल. सुरक्षा रक्षकांनी केलेल्या जादा कामाचा मोबदला हा दुप्पट दराने देण्यात येईल. सर्व नोंदित मुख्य मालकांना व खाजगी एजन्सींना याव्दारे सुचित करण्यात येते की, नोंदित सुरक्षा रक्षक / अधिकारी यांचे दि. ०१/०७/२०२३ पासुन वेतन, भत्ते व त्यावरील विहित करणेत आलेल्या दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

(एम. ए. मुजावर)
**सहाय्यक कामगार आयुक्त, तथा अध्यक्ष**
**सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली, सातारा.**

Scanned with CamScanner